UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

WWW

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| 16 | स्त्री–पुरूष–असमानता आणि मानवी अधिकार | प्रा.डॉ.गायकवाड यशवंत जंगलू | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 20 | स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | स्त्रीवादी स्त्रीजीवन | डॉ. सूर्यवंशी रामहरी मधुकर | 89 |
| 22 | 'ग्रामीण साहित्य' हा वेगळा प्रवाह कशासाठी ? | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 92 |
| 23 | नांदेड जिल्ह्याचा आर्थिक व सामाजिक अभ्यास | डॉ.एन.एन.मुंढे | 95 |
| 24 | चार्वाकांचा 'देहात्मवाद' | प्रा. शितल रुद्रमनी येरुले | 100 |
| 25 | योगदर्शनातील मानसशास्त्र | प्रा. भुसारे जी.एन. | 103 |


S.P.Mahavidyalaya,Bhoom • Bhoom • Tq.Bhoom Dist.O.bad

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# स्त्री–पुरुष–असमानता आणि मानवी अधिकार

प्रा.डॉ.गायकवाड यशवंत जंगलू
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम, ता.भूम जि.उस्मानाबाद

----------------(16)----------------

प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री जीवनात अनेक बदल स्थित्यंतरे घडून येण्यास मोठया प्रमाणात सुरुवात झाली आहे. सामजिक सुधारणांच्या बरोबरच स्त्री जागृतीला सुरुवात झाली. अनेक चळवळींच्या माध्यमातून स्थित्यंतरे, बदल, राजकीय, वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक, व्यावसायिक जीवनातही स्थित्यंतरे होत गेली. स्त्रीयांचा सर्वच क्षेत्रात जसा सहभाग वाढत गेला तसा तिच्या समस्या वाढत गेल्या. असा स्त्रियांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. पुढे त्याला कायद्याची जोड दिली गेली. परंतु आधुनिक कालखंडात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीला आपल्या समस्यांची जाणीव होत गेल्याने त्या समस्या सोडविण्यासाठी स्त्रियांचेही प्रयत्न होत गेले. त्यांच्या अनेक संघटना उभारल्या गेल्या आपल्या हक्कासाठी संघर्षाची तयारी ठेवली. त्यातून त्यांच्या चळवळी वाढीस लागल्या. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. समानतेचा हक्क मिळविण्यासाठी स्त्रियांना संघर्ष करावा लागल आणि अजूनही करावा लागतो आहे. नवीन समस्या निर्माण होत आहेत.

स्त्रियांच्या समस्यांचा विचार करून त्यानुसार वेळोवेळी कायद्यात सुधारणा करण्यात आल्या अर्थार्जनासाठी स्त्री बाहेर पडल्याने तिच्या व्यक्तिगत, कौटुंबिक समस्या निर्माण झाल्या.

शतकानुशतके पुरूषप्रधान व्यवस्थेच्या विचारांच्या चौकटीत स्त्रियांना अजूनही दुय्यम स्थान आहे. आज विज्ञानाने इतकी प्रगती केलेली असली तरी स्त्रीवर लादलेले निकृष्ठ जीवनाचे चित्र पुरेसे बदललेले नाही. जगाच्या प्रत्येक देशाच्या समाजातील 'स्त्री' ही मुख्य प्रवाहापासून दूर किनाऱ्यावर फेकली गेली आहे. तिच्या प्रश्नाचे स्वरूप देशकाल, परिस्थिती परत्वे थोडफार वेगळ असले तरी स्त्री समस्या नाहीत अशी परिस्थिती कोठेही आढळत नाही.

स्त्रियांच्या वाटयाला पुरूषापेक्षा भिन्न दुय्यम, कनिष्ठ आणि विषय जीवन येते. हा अनुभव जगातील सर्व स्त्रियांचा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत गुरफटलेल्या स्त्रियांनी स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्यास जेव्हा सुरूवात केली, तेव्हा तिला स्वतःच्या अस्तित्वाची, शक्तीची व सामर्थ्याची जाणीव होउ लागली. स्वतःचा 'माणूस' म्हणून विचार सर्वप्रथम तिच्या डोळयासमोर आला अणी याच विचारातुन जगातील स्त्रियामध्ये जागृती निर्माण झाली. आज कुटुंब व समाजातील पुरूषी वर्चस्व कायम राहिले हे जाणून त्यांच्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. अशी व्यापक परिवर्तनवादी भूमिका स्त्री चळवळीनी घेतलेली आहे.

मानवी हक्क आणि महिला:

जागतिक स्तरावर मानवी हक्काचा अभ्यास करत असतांना महिलांच्या बाबतीतही विचार करणे गरजेचे झालेले आहे. कारण निमर्गतः स्त्री–पुरूष समान आहेत. परंतू समाजात जाती, धर्म, लिंग यांच्या आधारवर भेदभावपूर्ण व्यवहार केले जातात. त्यामुळे मानवी अधिकाराचे उल्लंघन होते. अशा प्रकारचा सामाजिक अन्याय लिंगाच्या आधारावर स्त्रियांवर केला जातो. भारतामध्ये प्राचीन काळापासून कुटुंब, व्यवस्थेमध्ये पितृसत्ताक कुटुंब पध्दती रूढ असल्या करणाने स्त्रियांना असमानतेची वागणूक असलेली दिसून येते.

पुरूषांच्या तुलनेत महिला त्यांच्या नैसर्गिक अधिकाराबाबत काहीशा उदासीन असल्याचे चित्र आहे. वैद्यकीय सेवा सुविधा असोत की, स्थावर मालमत्तेची मालकी किंवा रोजगाराच्या संधी असोत पुरूषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग कमी आहे. भारतासारख्या पुरूषप्रधान संस्कृती असणाऱ्या आणि अरब राष्ट्रात हा प्रकार प्रकर्षाने जाणवतो.

जागतिक मानवी हक्क संघटनेने स्त्री विषयक मानवी हक्क सांगितले आहेत. ते म्हणजे सर्व क्षेत्रातील मानवी हक्काच्या बाबतीत स्त्रियांना समान व पूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत. सर्व प्रकारच्या कार्यक्षेत्रामध्ये स्त्रियांचा सहभाग परिणामकारक होण्यासाठी त्यांना समर्थ बनविण्यासाठी आवश्यक माहिती मिळाली पाहिज. स्त्रियांना त्यांच्या संपूर्ण आयुष्यात उच्च दर्जाच्या मानसिक व शारिरीक आरोग्याची हमी किंवा शाश्वती मिळाली पाहिजे.

शिक्षणांच्या सर्वच स्तरावर स्त्रियांना समान संधीची हमी मिळाली पाहिजे. निर्णय घेण्याच्या सर्व क्षेत्रामध्ये स्त्रियांना समान संधीची हमी मिळाली पाहिजे. निर्णय घेण्याच्या सर्व क्षेत्रामध्ये स्त्रियांना समान प्रवेश

Mahavidyalaya, Bhoom, Bhoom Dist.O'bad

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

मिळाला पाहिजे. इ.महत्वाचे हक्क स्त्रियांच्या विकासासाठी आवश्यक मानले व जागतिक आरोग्य संघटनेने स्त्रियांना ते बहाल केले व त्या त्या देशातील शासनाने यासाठी विशेष प्रयत्न करावेत अशा सूचनाही केल्या.

महिलासाठी हक्काचे विविध कायदे आले. मात्र त्याचा उपयोग होत नाही. बुरसटलेल्या मानसिकतेत बदल होणार नाही. तो पर्यत महिलांचा असाच बळी जात राहिल. त्याचबरोबर जापर्यत महिला स्व अस्तित्वासाठी कायदे समजून घेणार नाही. तोपर्यत तिच्यावर असाच अत्याचार होत राहिल. स्त्रियावर लादलेल्या रूढी, प्रथा, परंपराचे जोखड फेकुन देउनर मानसिकतेतच नव्हे तर शारिरिक द्रष्टयाही तिने सक्षम होणे काळाची गरज आहेच.

**भारतीय महिला:**

भारतीय समाज हा पुष्कळ असा पुरूषप्रधान स्थान दिले आहे. भारतीय समाजात विकृत, स्वरूपाच्या चालिरिती, रूढी परंपरा, पध्दतीरूढ मूल्य झाले आहेत. माणूस म्हणून स्त्रियांचा सन्मा केला जात नाही. स्त्रियावरील अन्यायाची अनेक उदाहरणे आहेत.

आजही स्त्री ही शिक्षणापासून वंचित ठेवली गेली आहे. सन 1951 मध्ये एकूण 18.33% साक्षरतेपैकी 08.86% त्रिया साक्षर होत्या तर सन 2001 मध्ये एकूण 64.84% पैकी स्त्री साक्षरता 53.67% होती. मुलींना शिक्षण नसल्यामुळे मुलीला चांगल्या दर्जाची नोकरी मिळू शकत नाही. पुरूष आणि स्त्री यांच्या कामाची तास आणि स्वरूपासारखे असतांना देखील वेतन सारखे दिले जात नाही. भारतात विवाहाच्या वेळी स्त्रीला हुंडा द्यावा लागतो. विवाहानंतरही मुलाकडचे लोक पैशाची किंवा महाग वस्तूची अपेक्षा करतात. त्यामुळे त्यांचा छळ होतो. त्यामुळे छळाला कंटाळून कांही स्त्रिया आत्महत्या करतात.

**महिलांचे सशक्तीकरण**

सशक्तीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. सामाजिक दृष्टिकोनातुन स्त्रियासकट अन्याय सुरू आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे महिलांचे सशक्तीकरण या शब्दांचे कांही अर्थ दिले आहेत. त्यानुसार सशक्तीकरण म्हणजे कायदेविषयक, नैतिक अधिकार देणे होय. सशक्तीकरण ही एक दीर्घ स्वरूपाची प्रकिया आहे. अभ्यासकाच्या मते सशक्तीकरणाचा अर्थ हा त्यात काही कमी अधिक फरक असू शकेल. साधारणतः सदृढ आरोग्य अर्थाजन करण्याची संधी, समान अधिकार, साक्षरतेचा अधिकार राजकारणात संधी, निर्णय प्रकियेत सहभाग इ.घटकावर महिलांचे सशक्तीकरण अवलंबून असते.

स्त्रियांना खरी गरज आहे समान हक्काची आणि समान संधीची आहे. स्त्रीला कुटुंबाच्या निर्णय प्रकियेमध्ये स्थान मिळायला हवे. त्यामुळेच तिला जीवन जगण्यात अधिक आनंद वाटेल.

भारत हा स्त्रियासाठी जगातला सर्वाधिक धोकादायक देश आहे. इंग्लगडच्या थॉमसन रायटर्स फाउडेशन जाहीर केलेल्या अहवाल देश, सरकार, समाज आणि कुटुंब व्यवस्था या साऱ्यानाच त्यांची मान शरमेने खाली घालायला लावणारा आणि शरमेच्या सागरात बुडविणारा आहे.

याच अहवालातील माहिती अशी की दर 05 मिनिटाला एक अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि त्यांतच त्यातल्या अनेकांची कुर हत्या, दर दहा मिनिटाला एखाद्या स्त्रीच्या विनयभंगासह अब्रु लुटीचा सध्याचा आलेख पाहिला की आपल्या सामाजिक व सांस्कृतिक अधोगतीचीच लाज वाट लागते. भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने हा अहवाल फेटाळला असला तरी त्या फेटाळण्याची भारतीया एवढीच जगानेही दखल घेतली नाही. बलात्कार, बलात्कारितेची हत्या, अल्पवयीन मुलीवर बळजोरी आणि स्त्रियावरचे एकूण अत्याचार यात अलीकडच्या काळात कमालीची वाढ झाली असून आपल्या सामाजिक संस्थानी आणि स्त्रियांच्या संघटनानी त्याची जेवढी दखल घेतली तेवढी ती देशाच्या पुरूषप्रधान सरकारने घेतली नाही. दर दिवशीची वर्तमानपत्रे अशा घृणास्पद घटनांचे पुरावे पुढे आणतात आणि ते पाहिले की आपल्या घरातील स्त्रिया व मुलींच्या सुरक्षेचीच साऱ्यांना चिंता वाटू लागते. यातल्या बहुतेक घटना उजेडात येत नाहीत व ते अत्याचार सहन करणाऱ्या मुलींना व स्त्रियांना केवळ मुस्कटदाबी सहन करावी लागते. त्यातुनच अशा अत्याचारामध्ये नात्यातल्या, जवळच्या व शेजाऱ्याचाही बरेचदा समावेश असल्याने त्या विषयीचे मौन सांभाळणेच मग जास्तीच्या अब्रुदारीचे लक्षण मानले जाते.

**स्त्री उध्दाराचे कार्य:**

भारतीय स्त्रियांच्या बाबतीत बोलायचे झाले तर इथल्या धर्माने, संस्कृतीने स्त्रीला दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती इ. रूपामध्ये देवता बनवून तिची पूजा केली तिची मंदिरे उभारली आणि असे असले तरी प्रत्यक्ष जीवनात मात्र तिला माणूस म्हणून कधीच वागविले नाही. पिढयान पिढयार तिचं आयुष्य इथल्या पुरूष प्रधान संस्कृतीवर अवलंबून ठेवले. तिला लहानपणी पित्यावर, तारूण्यात पतीवर तर वार्धक्यात मुलावर विसंबून ठेवले,

तिला अस्पृश्याप्रमाणेच शिक्षण नाकारले, मानसन्मान दिला नाही. घरातील कोणत्याही गोष्टीत निर्णय घेण्याचा तिला अधिकार नाही. आर्थिक स्वावलंबन तर दूरची गोष्ट आहे. अशावेळी आपण ज्या स्त्री मुक्तीची भाषा बोलतो त्या चळवळीचे उद्गाते ज्योतिराव फुले, आद्य स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच ठरू शकतात.

राष्ट्रपिता फुले आणि सा.फुले या जोडीने स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री उध्दाराचे जे कार्य आरंभिले होते त्या कार्याला स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून बळकटी आणली. नव्हे तर तथागत बुध्दाच्या स्वातंत्र्य समता, बंधुता या तीन तत्वावर घटना उभारून स्त्री–पुरूष समानता हा कायदाच बनविला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलित स्त्रियांच्याच संदर्भित कायदे केलेले नाहीत. तर सबंध भारतातील स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी, पुरूषाप्रमाणे स्त्रीलाही शिक्षण मिळावे, तिने आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनावे यासाठी घटनेत विशेष तरतूद केली. 'जात, वर्ग आणि पुरूष प्रधानता' या गोष्टींना स्त्रियांचे हक्क हिरावून घेतले होते. तिला गुलाम बनविले होते. आणि म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये 14 नुसार समानतेचा हक्क दिला आणि सांगितले की कायद्यापुढे सर्व समान असतील.

कलम/अनुच्छेद 15 मध्ये 'धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली त्याचबरोबर 15/3 मध्ये समानतेचे तल दृढ करण्यासाठी' स्त्रिचा व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही असे स्पष्ट केले. पुढे कलम 16 अनुच्छेद 1 व 2 नुसार सार्वजनिक सेवायोजनांच्या बाबीमध्येही धर्म, जात, वंश, लिंग, कूळ निवास जन्मस्थान इत्यादी कारणानी भेदभाव न करता सर्व नागरिकास समान संधी दिली गेली. भारतीय राज्यघटनेत या कलमांचा अतर्भाव करून भारतीय स्त्रियाचे स्वातंत्र्यपूर्व इतिहासात जे हक्क हिरावून घेतले होते ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहाल केले.

इथल्या परंपरेने स्त्रियांना चूल आणि मूल एवढयाच कक्षेत ठेवले होते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी घटनेत शिक्षणाची समानसंधी दिली, नोकरीची समानसंधी दिली आणि त्यामुळेच स्त्रियांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येत असल्याचे आपण पाहत आहोत. स्त्रियांना जर संधी दिली तर त्या या देशात सरपच, महापौर, मुख्यमंत्री ते प्रधानमंत्रीपदापर्यत पोहचू शकतात. आजपर्यत अनेक स्त्रिया पोहचल्याचेही आपण पाहिले आहे. स्त्रिया शिक्षिकेपासून ते आय.ए.एस.होण्यापर्यत मजल मारून पुरूषाइतकेच नव्हे तर कधी कधी पुरूषाच्याही पुढची कर्तव्य तत्परता दाखवितांना आपण पाहतो. हा सर्व समान संधीचाच फायदा आहे. हे सर्व घडले ते आपल्या परंपरावादी कायद्यांना छेद देत, तत्कालीन समाज व्यवस्थे विरूद्ध बंड पुकारून स्त्री मुक्तीचे ध्येय उराशी बाळगून अतोनात हा अपेष्टा सहन करीत. काळाशी झुंज देणाऱ्या राष्ट्रपिता ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुलेना, राजपदावरून अनेक पुरोगामी कायदे पारित करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांना, घटना समितीत राहून सामान्य माणसाचा, स्त्रियांचा, शोषितांचा, कष्टकऱ्यांचा, कामगारांचा देणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना या सर्व परिवर्तनाचे क्षेय जाते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना ज्या संस्कृतीने, परंपरेने छळले, त्याविरूध्द त्यांनी बंड पुकारले. 'मनुस्मृती' ही या देशाची राज्यघटना, भारतीयर दंड संहिताच होती. ज्या मनुस्मृतीने स्त्री, शुद्र आणि अतिशुद्राच्या अस्मितेला जाळून खाक केले होते. अशा मनुस्मृतीचे दहन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या दिवशी केले तो दिवस 25 डिसेंबर 1927. याच दिवशी स्त्रियांना अमानुषतेची वागणूक देणाऱ्या या मनुस्मृतीचे दहन केले. त्याच दिवशी या देशातील स्त्री स्वातंत्र्याची खरी पहाट उगवली पुढे स्वतंत्र भारताच मंत्रिमंडळात कायदेमंत्री असताना 'हिंदु कोड बील' मांडले. या बिलानुसार स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार, नवऱ्याने घटस्फोट दिल्यास तिला पोटगीचा अधिकार, स्त्रीला दत्तक घेण्याचा व मुलांच्या बरोबरीने तिला समान वाटा मिळण्याचा अधिकार, स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार इ.अधिकार देउन डॉ.बाबासाहेब आंबेडर यांनी भारतीय स्त्रियांचया प्रगतीची पारंपरिक कायद्यांनी अडविलेली वाट मोकळी करून दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिलाच्या आग्रह धरून स्त्रियावरील अन्याय दूर करण्यासाठी आणि पुरूषांच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न केले.

दिनांक 16 जून 1936 ला मुंबई येथील देवदासी, वाघ्ये, मुरळी इत्यादींच्या मेळाव्यात उपदेशपर भाषणात बाबासाहेब म्हणाले, स्त्री जात ही समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री ही उत्तम कुळातील असावी. अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो. कारण त्याला माहित असते की आपल्या कुटुंबाचा कुळाचा नावलैकिक हा स्त्रियांच्या शिलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्री वर्गाला प्राप्त झालेली आहे.



S.P. Mahavidyalaya Bhoom Dist. Osmanabad
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist Osmanabad

निष्कर्ष :-

थोडक्यात आज जागतिक पातळीवर महिलांचे एवढे मानवी हक्क मान्य होउनही आजसुध्दा स्त्रीयांचे शोषण प्राचीन आणि मध्ययुगीन स्त्रीपेक्षा कमी झाले. अनेक कौटुंबिक अधिकार प्राप्त झाले असले तरी त्यांचे शोषण थांबले आहे असे आपण म्हणू शकत नाही. स्त्रीयांच्या या शोषणाची कारणे शोधला जावीत. कडक कायदे केले जावेत. न्यायव्यवस्थेतील अधिकाऱ्यांच्या अभिवृत्ती आणि मूल्यात स्त्रीवादी दृष्टीकोनाची आवश्यकता हवी. असाच बदल पोलिस यंत्रणेत सुध्दा व्हायला हवा.

केवळ कायदे करूनच समाजातील सर्वप्रश्न सुटतात असे नाही. त्यातही रूढी परंपरा सर्वाधिक पगडा असणाऱ्या समाजात बदल घडून आणणे महत्वाचे आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती सकल जगास उध्दारी असे म्हटले जाते. परंतू पाळण्याची दोरी धरणारे हात सक्षम होणे महत्वाचे आहे. स्त्री फक्त एक उपभोगाची साधन नसून त्याची जाण समाजाला होणे गरजेचे आहे.

महिला अत्याचार कौटुंबिक हिंसाचारासाठी महिला कोर्टाची वेगळी स्थापना करण्यात यावी. एकंदरीत महिलांचे जीवन चांगले सुसाहाय्य, सुरक्षित व वंदनिय रहावे हेच मानवी हक्काचे महत्व आहे असे म्हणावे लागेल.

संदर्भ ग्रंथ

1. भारतीय स्त्री शक्तीची संविधानिक भूमिका– मेघा नानिवडेकर
2. स्त्री विकासाच्या पाउलखुण– डॉ.स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन, पुणे
3. महिला सबलीकरण – रोडे विजया
4. स्त्री विकासाची नवे क्षितीज– डॉ.स्वाती कर्वे
5. भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण– प्रा.चि.ग.घांगरेकर
6. स्त्री प्रश्नांची वाटचाल– विद्युत भागवत
7. दै.सम्राट– 28 जून 2018, पान. 4
8. दै.लोकमत–28 जून 2018 पान.06
9. योजना– डिसेंबर 20015, मे 2007, मार्च 2009
10. लोकराज्य– नोव्हेंबर 2008

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Ta. Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad